**बी.एड्.नियमावली**
**(शैक्षणिक वर्ष 2009–10)**

1) शासकीय सूचनेनुसार सत्र 2009–10 या शैक्षणिक वर्षातील कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व बी.एड्. प्रवेश विश्वविद्यालयाच्या केंद्रीय समितीद्वारे केले जातील.

2) विश्वविद्यालयाच्या बी.एड्. केंद्रीय प्रवेश समितीत प्रत्येक संलग्नित महाविद्यालयाचे अर्हताधारक प्राचार्य व कायम मान्यता असलेला अधिव्याख्याता त्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करेल.

3) प्रवेशाच्या तारखांचे वेळापत्रक वेळोवेळी सचिव, केंद्रीय बी.एड्. प्रवेश समिती निर्धारित करतील व त्यास राज्यस्तरीय जाहिरातीच्या स्वरूपात प्रसिद्ध केले जाईल. हा प्रसिद्धचा खर्च सर्व संलग्नित व संचालित बी.एड्. महाविद्यालयाने समप्रमाणात विभागून विश्वविद्यालयात जमा करावयाचा आहे.

4) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील संचालित महाविद्यालयात आणि संलग्नित महाविद्यालयात होणारे बी.एड् प्रवेश **वर्ष 2009 च्या बी.एड् सी.ई.टी परीक्षेत उत्तीर्ण** विद्यार्थ्यामधूनच केले जातील.

5) प्रत्येक संलग्नीत महाविद्यालयाने बी.एड् प्रवेश करताना प्रत्येक प्रवेशयोग्य विद्यार्थ्याची अर्हता व मूळ कागदपत्रे तापासून घ्यावीत आणि ती एन.सी.टी.ई च्या आणि विश्वविद्यालयाच्या बी.एड् प्रवेशाच्या अर्हतापूर्ण करीत असेल तरच त्याला प्रवेश द्यावा.

6) प्रवेशेच्छु हा कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर असावा. 12 वी किंवा त्यावरील स्तराची संस्कृत विषयाची परीक्षा उत्तीर्ण असावा.

7) विद्यार्थ्याचे प्रवेशाचे सर्व दस्तावेज केंद्रीय बी.एड प्रवेश समिती, क.का.सं.वि यांच्ये कडून तपासून घ्यावे चुकीच्या अर्हतेवर प्रवेश केल्यास व केंद्रीय बी.एड् प्रवेश समिती क.का.सं.वि, कडून तपासून न घेतल्यास विद्यार्थ्याच्या होणाऱ्या सर्व प्रकारच्या नुकसानाबद्दल संबंधीत महाविद्यालयाचे व्यवस्थापन जबाबदार राहील व अशा महाविद्यालयावर विश्वविद्यालयाकडून कार्यवाही केली जाईल. केंद्रीय प्रवेश समितीकडून नियोजित दिवशी दस्तावेजांची तपासणी होइपर्यंत सर्व प्रवेश **Provisional** (अस्थायी) ठेवावेत.

8) प्रवेशित विद्यार्थ्याचे सर्व मूळ दस्तावेज विश्वविद्यालयाकडे प्रवेश प्रक्रिया आटोपताच तातडीने तपासण्यास सादर करण्याची जबाबदारी त्या महाविद्यालयाची राहिल व सादर केलेल्या प्रत्येक दस्तावेजाची पोच पावती घेण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहिल.

9) प्रवेश करीत असतांना त्या विद्यार्थ्याकडून विद्यापीठ निर्धारित विद्यापीठ विकासनिधी शुल्क डी.डी. च्या स्वरुपात जमा करावे. डी.डी हा कुलसचिव, क.का.संस्कृत विश्वविद्यालय, या नावाने असावा व तो नागपूर येथे देय असावा. हे शुल्क विश्वविद्यालयाच्या केंद्रीय बी.एड् प्रवेश समिती, (बी.एड् विभाग) कस्तुरबा भवन बजाज, नगर, नागपूर येथे जमा करावे.

10) प्रत्येक महाविद्यालयाने शिक्षण शुल्क समितीच्या प्रवेश नियंत्रण समितीच्या व राज्य शासनाच्या प्रवेश तपासणी समितीच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

11) विश्वविद्यालयात विद्यार्थ्याचे दस्तावेज पाठविताना प्रत्येक विद्यार्थ्याचे सी.ई.टी स्कोअर कार्ड देणे बंधनकारक आहे. सी.ई.टी च्या गुणांची पात्रता तपासून सादर करावे.

12) विद्यार्थी प्रवेश व त्यानंतरच्या सर्व प्रक्रियेच्या बाबतीत विश्वविद्यालयाच्या वार्षिक वेळापत्रकाचे (Academic Calender 2009-10) पालन करणे बंधनकारक आहे.

13) अभ्यासक्रमात त्या वर्षासाठी कोणता बदल झालेला आहे याची माहिती संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विश्वविद्यालयाच्या रामटेक कार्यालयातील विद्या विभागातून घेणे आवश्यक आहे. ही माहिती पत्रोपत्री न मागता प्रत्यक्ष प्राचार्य किंवा जबाबदार अधिव्याख्याता पाठवून घ्यावी.

14) वर्गारंभी/सत्रारंभी ही सर्व माहिती संबधीत महाविद्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे.

15) बी.एड् अभ्यासक्रमाचे महाविद्यालय चालविणाऱ्या **संस्थेच्या** पदाधिकाऱ्याला किंवा त्या संस्थेच्या महाविद्यालयाच्या पदाधिकाऱ्याला तो पदाधिकारी असतांना त्या संस्थेच्या बी.एड् महाविद्यालयात विद्यार्थी म्हणून प्रवेश घेता येणार नाही अश्या व्यक्तीला प्रवेशासाठी सर्व कायदेशिर कार्यवाही म्हणजे विद्यार्थी असेपर्यंत पदाधिकारी न राहणे व पदाधिकारी पद सोडल्याचा Change Report सक्षम अधिकाऱ्याकडून प्राप्त झाल्यावरच विद्याथी म्हणून विश्वविद्यालयाच्या केंद्रीय बी.एड्. प्रवेश समितीच्या पूर्व परवानगीने प्रवेश घेणे या बाबी पूर्ण करणे अनिवार्य राहील.

**<u>अत्यतं महत्त्वाचे –</u>**

16) प्रवेशाच्या बाबतीत महाविद्यालय व्यवस्थापनाने आरक्षणाच्या नियमांचे कटाक्षाने पालन करावे आणि आरक्षित जागांवर दिलेल्या प्रवेशाच्या समर्थनार्थ जाती वैधता प्रमाणपत्र, Creamy Layer वगैरे दस्तावेज तपासून ते सर्व विश्वविद्यालयाला इतर दस्तावेजांसह सादर करावे.

17) विद्यार्थ्याच्या परीक्षा शुल्काबाबत किंवा नोंदणी शुल्काबाबत विश्वविद्यालयाकडून सामूहिक पावती दिली जाईल. महाविद्यालयानेही हे शुल्क एकाच डी.डी.व्दारे विश्वविद्यालयात जमा करावे. विद्यार्थी निहाय डी.डी. स्वीकारले जाणार नाहीत आणि विद्यार्थी निहाय पावती दिली जाणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी. विद्याथीनिहाय पावती त्या त्या महाविद्यालयाने द्यावी.

18) महाविद्यालयाकडून चुकीच्या पद्धतीने/अर्हतेने विद्यार्थ्याचा प्रवेश झाला तर त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहिल. त्याला केंद्रीय बी.एड् प्रवेश समिती क.का.सं.वि, त्याला मान्यता देणार नाही किंवा एम.के.सी.एल् किंवा उच्च शिक्षण संचालक, यांना जबाबदार धरता येणार नाही. अशा चुकीच्या प्रवेशाबद्दल व विद्यार्थ्याच्या झालेल्या वर्षाच्या नुकसानाबद्दल महाविद्यालयाला तीव्र दंड केला जाईल ज्याचे स्वरूप गंभीर असेल याची नोंद घ्यावी.

स्वा/–
सचिव
केंद्रीय बी.एड्. प्रवेश समिती
क.का.संस्कृत विश्वविद्यालय